केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना सन २०१८-१९ या आर्थिक वर्षातील माहे एप्रिल, २०१८ ते जुलै, २०१८ करिता अनुदानाचे वितरण.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक: राकुला -२०१८/प्र. क्र. १११/विसयो
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- २४ मे, २०१८.

वाचा :-

१. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, क्र. विसयो २०१०/प्र.क्र.१७५/ विसयो २, दि. २६ ऑक्टोबर २०१०.
२. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.मकोनी-१०१०/प्र.क्र.३२/कोषा-प्र.५, दि. १२ जुलै, २०११.
३. शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६९/अर्थ-३, दि. २ एप्रिल, २०१८.
४. शासन ज्ञापन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्रमांक बीजीटी २०१८/प्र.क्र.५४/ अर्थसंकल्प, दिनांक १६ एप्रिल, २०१८.

शासन निर्णय :-

सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाकरिता केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेच्या अंमलबजावणीसाठी रुपये १०,४४,००,०००/- (रुपये दहा कोटी चव्वेचाळीस लक्ष फक्त) एवढी अर्थसंकल्पीय तरतूद मंजूर झालेली आहे. वित्त विभागाचे संदर्भ क्रमांक ३ येथील शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कुटुंब लाभ योजनेसाठी एकूण तरतूदीच्या ७० टक्केपैकी, एप्रिल, २०१८ ते जुलै, २०१८ या कालावधीच्या खर्चासाठी रुपये ३,२४,८०,०००/- (रुपये तीन कोटी चोवीस लक्ष ऐंशी हजार फक्त) वितरीत करण्यास शासन याद्वारे मान्यता देत आहे. तसेच मासिक विवरण पत्रानुसार निधी पुढे / मागे ओढून घेण्याची सुविधा अर्थसंकल्पीय अंदाज वितरण व सनियंत्रण प्रणालीवर देण्यात आलेली आहे.

२. सर्व जिल्हाधिकारी यांना कळविण्यात येते की, सोबतच्या विवरणपत्रातील स्तंभ क्र.३ New CO Code वर संबंधित जिल्हयाना निधी वितरीत करण्यात आलेला आहे. त्यांनी वितरीत केलेल्या अनुदानाचे वाटप त्यांच्या जिल्हयातील तालुक्यांना लाभार्थ्यांच्या प्रमाणानुसार करावे. सदरचे अनुदान वितरण जिल्हाधिकाऱ्यांनी कळविलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार करण्यात आले आहे. संदर्भ क्र. २ येथील परिपत्रकानुसार उणे पध्दतीने प्राधिकारपत्र काढण्यास मुभा आहे.

३. सदरहू निधीमधून झालेला खर्च " मागणी क्रमांक एन-३, मुख्य लेखाशीर्ष २२३५, सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२-समाजकल्याण, १०४-वृध्द विकलांग व निराश्रीत व्यक्तींचे कल्याण, (०८)(०५) राष्ट्रीय कुटुंब लाभ योजना-दारिद्रय रेषेखालील कुटुंबाला अर्थसहाय्य (केंद्र पुरस्कृत योजना) (कार्यक्रम), ५०-इतर खर्च (२२३५ ३००५)” या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकावा.

४. सर्व जिल्हाधिका-यांना कळविण्यात येते की, त्यांनी संदर्भ क्र. ३ येथील वित्त विभागाच्या परिपत्रकातील अटी व शर्तीची पुर्तता करुन कोषागारात देयके सादर करण्याची दक्षता घ्यावी.

५. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी हा खर्च कोणत्याही परिस्थितीत त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानापेक्षा जास्त होणार नाही, याबाबत दक्षता घ्यावी.

६. सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात येते की, त्यांनी त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आलेल्या अनुदानातून केलेल्या खर्चाचा महालेखापालांच्या कार्यालयात नोंदविलेल्या खर्चाशी ताळमेळ घालून त्याप्रमाणे ताळमेळाचे विवरणपत्राची प्रत या विभागाच्या लेखा परीक्षण कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास त्वरित पाठवावीत व त्याची प्रत या विभागाच्या नियोजन कार्यासनास व या कार्यासनास पाठवावी. खर्चाच्या ताळमेळाचे काम व्यवस्थितरित्या पार न पाडल्यास, तसेच उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांच्या कार्यालयास विहित वेळेत सादर न केल्यास, त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकाऱ्यांवर राहील.

७. हा शासन निर्णय वित्त विभाग अनौपचारिक संदर्भ क्रमांक १९५/२०१८/व्यय १४, दिनांक १६.०५.२०१८ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २०१८०५२४१३१८५४६३२२ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Siddharth Amrutrao Zalte

Digitally signed by Siddharth Amrutrao Zalte
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=dc54b49c6f5c903027053476b3a6ef50b46ff44a7e8b820fef7bfdd100c56194, cn=Siddharth Amrutrao Zalte
Date: 2018.05.24 13:23:16 +05'30'

(सि. अ. झाल्टे)
अवर सचिव , महाराष्ट्र शासन

प्रति,

१) विभागीय आयुक्त, पुणे/कोकण/नाशिक/नागपूर/अमरावती व औरंगाबाद,
२) सर्व जिल्हाधिकारी.
३) संचालक, लेखा व कोषागारे, नवीन प्रशासकीय भवन, ५ वा मजला, महाराष्ट्र राज्य ,मुंबई
४) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई (२ प्रती)
५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
६) महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता(, मुंबई / नागपूर.
७) वित्त विभाग, अर्थसंकल्प ३ ,४, ५ अर्थोपाय व व्यय १४, मंत्रालय, मुंबई
८) उप सचिव (अर्थसंकल्प), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) सहाय्यक संचालक (वित्त व लेखा), लेखापरिक्षण कक्ष, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) निवड नस्ती, विसयो.

ANNEXTURE

Accompinement of Government Resolution No.RKL-2018/C.R.111/ Visayo,

Dated: 24 May, 2018

Centrally Sponsored National Family Benefit Scheme (Rs in Thousand)

Sr.no	District	Apr-18	May-18	Jun-18	Jul-18	Total Amount Released Vide this order 7= (3+4+5+6)
1	**2**	**3**	**4**	**5**	**6**	**7**
1	Mumbai	220	220	220	240	900
2	Mumbai Suburban	220	220	220	240	900
3	Thane	220	220	220	240	900
4	Raigad	220	220	220	240	900
5	Ratnagiri	220	220	220	240	900
6	Sindhudurg	220	220	220	240	900
7	Palghar	220	220	220	240	900
	Kokan	**1540**	**1540**	**1540**	**1680**	**6300**
8	Nashik	220	220	220	240	900
9	Dhule	220	220	220	240	900
10	Jalgaon	220	220	220	240	900
11	Ahmednagar	220	220	220	240	900
12	Nandurbar	220	220	220	240	900
	Nashik	**1100**	**1100**	**1100**	**1200**	**4500**
13	Pune	220	220	220	240	900
14	Solapur	220	220	220	260	920
15	Satara	220	220	220	240	900
16	Sangali	220	220	220	240	900
17	Kolhapur	220	220	220	240	900
	Pune	**1100**	**1100**	**1100**	**1220**	**4520**
18	Nagpur	220	220	220	260	920
19	Wardha	220	220	220	240	900
20	Chandrapur	220	220	220	240	900
21	Bhandara	220	220	220	240	900
22	Gadchiroli	220	220	220	240	900
23	Gondia	220	220	220	240	900
	Nagpur	**1320**	**1320**	**1320**	**1460**	**5420**
24	Amaravati	220	220	220	260	920
25	Akola	220	220	220	240	900
26	Yavatmal	220	220	220	240	900
27	Buldhana	220	220	220	240	900
28	Washim	220	220	220	240	900
	Amaravati	**1100**	**1100**	**1100**	**1220**	**4520**
29	Aurangabad	220	220	220	260	920
30	Beed	220	220	220	240	900
31	Nanded	220	220	220	240	900
32	Parbhani	220	220	220	240	900
33	Osmanabad	220	220	220	240	900
34	Jalana	220	220	220	240	900
35	Latur	220	220	220	240	900
36	Hingoli	220	220	220	240	900
	Aurangabad	**1760**	**1760**	**1760**	**1940**	**7220**
	Grand Total	**7920**	**7920**	**7920**	**8720**	**32480**